महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ७७ वा | दिनांक : १७/१२/२०२४ | वार : मंगळवार

# एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत नाराजीचा भडका



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारचा रविवारी मंत्रिमंडळ विस्तार झाला. त्यात शिवसेनेच्या अब्दुल सत्तार, तानाजी सावंत, दीपक केसरकर, विजय शिवतारे व प्रकाश सुर्वे ५ बड्या नेत्यांना स्थान मिळाले नाही. त्यामुळे आता या नेत्यांसह त्यांचे शेकडो समर्थक अस्वस्थ असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. या ५ जणांसह अन्य एका नेत्याने तर शिवसेना उपनेतेपदाचा राजीनामा देऊन आपली खदखद व्यक्त केली आहे. यामुळे आगामी दिवसांत सत्ताधारी शिवसेनेत मोठे राजकारण रंगण्याची चिन्हे आहेत.

महायुती सरकारच्या मंत्रिमंडळ विस्तारात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या कोट्यातून शंभूराज देसाई, उदय सामंत, दादा भुसे, गुलाबराव पाटील, संजय राठोड, संजय शिरसाट, प्रताप सरनाईक, भरत गोगावले, प्रकाश आबिटकर या ९ जणांना कॅबिनेट मंत्रिपद मिळाले. तर आशिष जयस्वाल व योगेश कदम यांना राज्यमंत्रिपद मिळाले. या विस्तारातून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोडचे आमदार तथा माजी मंत्री अब्दुल सत्तार, माजी आरोग्यमंत्री तानाजी सावंत व माजी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांना वगळण्यात आले.

याशिवाय विजय शिवतारे व प्रकाश सुर्वे या दोन नेत्यांचाही यावेळी मंत्रिमंडळात समावेश होणार असल्याची माहिती होती. पण भाजपच्या दबावामुळे या पाचही नेत्यांना मंत्रिपदाची संधी मिळाली नाही. आता हे नेते नाराज झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. अब्दुल सत्तार यांनी या प्रकरणी अद्याप आपली प्रतिक्रिया दिली नाही. तर तानाजी सावंत हे नॉट रिचेबल आहेत. त्यांच्या कार्यालयाने पत्रकारांना सावंत प्रतिक्रियेसाठी सध्या उपलब्ध नसल्याचे सांगितले आहे.

दुसरीकडे, दीपक केसरकर यांनी पक्षश्रेष्ठींचा निर्णय मान्य असल्याचे सांगत आपण पक्षावर नाराज नसल्याचे सांगितले आहे. मी पक्षाच्या निर्णयावर नाराज नाही. माझ्या चेहऱ्यावरही कुठे नाराजी दिसत नाही. जनतेने महायुतीला स्पष्ट बहुमत दिले आहे. त्यामुळे त्या स्पीरिटने काम देखील झाले पाहिजे. आता नवे सरकार व त्याचे मंत्री आलेत. नव्या मंत्र्यांच्या चेहऱ्यावर किती आनंद आहे हे पाहा. त्यांच्या आनंदात आपण सहभागी झाले पाहिजे, असे ते म्हणालेत.

विजय शिवतारे यांनीही या प्रकरणी आपली नाराजी उघडपणे मांडली आहे. हा मंत्रिमंडळ विस्तार मला विश्वासात न घेता झाला. त्यामुळे आता अडीच वर्षांनी मला मंत्रिपद दिले तरी मी ते घेणार नाही, असे ते म्हणालेत. आमदार प्रकाश सुर्वे यांनीही या प्रकरणी आपली नाराजी व्यक्त केली.

दरम्यान, मंत्रिपदासाठी इच्छूक असलेल्या भंडारा विधानसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांनीही आपल्या मनातील खदखद व्यक्त केली आहे. त्यांनी मंत्रिपद न मिळाल्यामुळे उघडपणे एकनाथ शिंदेंवर टीका करत देवेंद्र फडणवीस यांची भाजप येण्याची ऑफर नाकारल्याचा आता पश्चाताप होत असल्याचा दावा केला आहे. भोंडेकर यांनी यासंबंधी शिवसेना उपनेतेपदाचा राजीनामाही दिला आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे आपल्या नाराज नेत्यांची कशी मनधरणी करणार याकडे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

# रामदास आठवलेंची भाजपने मागितली माफी

**पुणे :** महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा रविवारी विस्तार झाला. नागपूरच्या राजभवनमध्ये पार पडलेल्या या सोहळ्याचे महायुतीचा भाग असलेले रामदास आठवले यांना निमंत्रणच देण्यात आले नव्हते. यावरून रामदास आठवले यांनी आपली नाराजी उघडपणे जाहिर केली होती. रामदास आठवलेंच्या नाराजीवरून भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांची माफी मागितली आहे. आमच्याकडून चूक झाल्याचे बावनकुळे म्हणाले.

नागपूर येथील राजभवनमध्ये मंत्रिमंडळाचा शपथविधी पार पडला. यामध्ये ३३ जणांनी कॅबिनेट तर ६ जणांनी राज्यमंत्रीपदाची घेतली. सरकारकडून या शपथविधी सोहळ्याचे विरोधी पक्षाला निमंत्रण गेले होते. मात्र महायुतीत सहभागी असलेल्या रिपाइं आठवले गटाला निमंत्रण देण्याचे राहून गेले. त्यामुळे रामदास आठवले नाराज झाले होते. त्यांच्या नाराजीची भाजपने अखेर दखल घेतली आहे.

मंत्रिमंडळ विस्ताराचे निमंत्रण न भेटल्यामुळे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी रामदास आठवले यांची माफी मागितली. मी रामदास आठवले यांची माफी मागतो. त्यांना गडबडीत मंत्रिमंडळ विस्ताराचे निमंत्रण वेळेत पोहचले नाही. आमच्याकडून चूक झाली आहे, असे म्हणत बावनकुळे यांनी आठवलेंची जाहिर माफी मागितली. ते आज पुण्यात बोलत होते.महायुतीचा एक भाग असूनही शपथविधीचे मला निमंत्रण आले नाही. जेव्हा निवडणुका असतात, तेव्हा मला सगळीकडे नेले जाते.

आता शपथविधीसाठी मला निमंत्रणही मिळाले नाही, असे म्हणत रामदास आठवले यांनी महायुतीबाबत नाराजी बोलून दाखवली होती रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने विधानसभा निवडणुकीत चांगली कामगिरी केली. आमचा समाज मोठ्या संख्येने भाजपबरोबर राहिला.

अडीच वर्षांच्या सरकामध्येही आमच्या पक्षाचा एकही मंत्री नव्हता. मला वाटते की गावागावात आमचे कार्यकर्ते आहेत. पण आता त्यांना कसे तोंड दाखवायचे हा माझ्यापुढे प्रश्न असल्याचे रामदास आठवले म्हणाले होते.

# भुजबळांचे मंत्रिपद हुकले, तो आमचा प्रश्न नाही : मनोज जरांगे





**आंतरवाली सराटी :** राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळातून डावलण्यात आले. भुजबळांना मंत्रिमंडळात स्थान मिळाल्यावरून मनोज जरांगे यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात का घेतले नाही?, हा आमचा प्रश्न नाही. मराठा आरक्षणाच्या मारेकऱ्याचे आम्हाला काही देणे-घेणे नसल्याचे मनोज जरांगे म्हणाले. तसेच उद्या पत्रकार परिषद घेऊन पुढील उपोषणाची तारीख असल्याचेही ते म्हणाले.

देवेंद्र फडणवीसांच्या मंत्रिमंडळाचा रविवार विस्तार झाला. ३३ आमदारांनी कॅबिनेट तर ६ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. परंतु, या मंत्रिमंडळातून छगन भुजबळ यांना डावलण्यात आले आहे. याबाबत भुजबळांनी आपली नाराजी उघडपणे व्यक्त केली. मी एक कार्यकर्ता आहे, त्यामुळे मला घेतले काय आणि फेकले काय? मंत्रिपद आले गेले पण भुजबळ संपला नाही, अशा शब्दांत छगन भुजबळांनी आपली नाराजी व्यक्त केली. त्यांच्या नाराजीवर मनोज जरांगे यांनी जास्त बोलणे टाळले.

छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात का घेतले नाही?, हा आमचा प्रश्न नाही. मराठा आरक्षणाच्या मारेकऱ्याचे आम्हाला काही देणे घेणे नाही. फक्त एवढीच प्रतिक्रिया मनोज जरांगे यांनी दिली. पुढे बोलताना मनोज जरांगे यांनी नागपूरात सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी काढावा, असे आवाहन सरकारला केले. देवेंद्र फडणवीसांनी बोलल्याप्रमाणे मराठा समाजाला आरक्षण दिले पाहिजे, अशी मागणीही जरांगे यांनी केली.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १७ डिसेंबर २०२४


## पहिल्या जे. डी. पी. एल. क्रिकेट मालिकेत बदनापूर टायगर्स ठरला विजयाचा मानकरी



**बदनापूर (डॉ. रामेश्वर पाटील) :** यावर्षी जिल्हाभरातील सर्व पॅथीच्या डॉक्टरांसाठी जालना डॉक्टर्स प्रीमियर लीगचे भक्त कॉलेजच्या ग्राउंड वरती आयोजन करण्यात आले होते या क्रिकेट मालिकेत जालना जिल्ह्यातील ११ संघ सहभागी झाले होते, ज्यामध्ये अंबड अवेंजर्स ,बदनापूर टायगर्स, मंठा इंडियन्स, कलावती आयएमए, संजीवनी हॉस्पिटल, दाभाडी स्ट्रायकर्स, नीमा वॉरियर्स, राजूर रॉयल्स, नवजीवन हॉस्पिटल, जाफराबाद स्ट्रायकर्स, दाभाडी स्ट्रायकर्स, हिट अँड रन जालना या संघांनी भरभरून प्रतिसाद देत तीन दिवसीय जे डी पी एल यशस्वी करण्याच्या दृष्टीने सहभाग नोंदवला.

यामध्ये तीन ग्रुप बनवून तीन दिवसीय सामने घेण्यात आले प्रत्येक संघाने दोन दोन लिग मॅच खेळत दोन उपांत्य सामने बदनापूर टायगर्स विरुद्ध निमा वॉरियर्स आणि आयएमए कलावती विरुध्द जाफराबाद स्ट्रायकर्स असे झाले ज्यातून विजेते ठरलेले बदनापूर व जाफराबाद यांच्यात अंतिम सामना खेळविण्यात आला.अंतिम सामन्यात बदनापूर टायगर्स ने दणदणीत विजय मिळवत पहिल्या जेडीपीएल च्या विजयाचे मानकरी ठरले.

यामध्ये उत्कृष्ठ गोलंदाज डॉ अमोल लहाने तर मालिकावीर व उत्कृष्ट फलंदाज डॉ. अमोल सोरमारे हे ठरले तर अंतिम सामन्यात अर्धशतक झळकावून व गोलंदाजी मध्ये तीन विकेट्स चटकावून बदनापूर टायगर्स चे डॉ. अर्जुन तोडकर हे सामनावीर ठरले.

या मालिकेत विजयी होणाऱ्या संघास प्रथम पारितोषिक म्हणून कलावती हॉस्पिटल जालना यांच्यावतीने ३१ हजारांचे रोख पारितोषिक व डॉक्टर पायमोडे यांच्या वतीने चषक देण्यात आला तर संजीवनी हॉस्पिटल यांच्याकडून उपविजेता ठरलेल्या संघास २१ हजारांचे द्वितीय पारितोषिक व चषक डॉ.आशिष राठोड, डॉ.प्रदीप पंडित,डॉ.सोळंके,अमोल कदम,डॉ. पायमोडे यांच्या हस्ते देण्यात आले.

सदरील क्रिकेट मालिका यशस्वी करण्यास गुरु मिश्री होमिओपॅथिक तथा आयुर्वेदिक महाविद्यालयाचे संचालक डॉ. योगेश देसरडा यांचे मोलाचे सहकार्य लाभले त्याचबरोबर निरामय हॉस्पिटल, आधार हॉस्पिटल ,ओजस हॉस्पिटल, अमृत बाल रुग्णालय, साई बाल रुग्णालय, पायमोडे संधिवात हॉस्पिटल आणि डॉ.दयानंद भक्त व भक्त कुटुंब यांनी ग्राउंड उपलब्ध करून सहकार्य केले.

सदरील क्रिकेट मालिकेत सागर सागर ना,शिव महाडिक यांनी पंचगिरी तथा अशोक आडेप यांनी सर्व सामन्यांचे समालोचन केले. डॉ. सुदर्शन थोटे,डॉ.योगेश ढेंबरे ,डॉ.राम पाटील, डॉ.अर्जुन तोडकर डॉ.सचिन उकरडे डॉ. सतीश शिंदे व डॉ. विशाल पुंगळे यांनी संयोजन समिती म्हणून कार्य केले

## स्थलांतरित मुलांच्या शिक्षणासाठी बालरक्षक टिम ऊसाच्या फडात



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड तालुक्यातील स्थलांतरित ऊसतोड मजूरांच्या पाल्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी बालरक्षक टिम ने पश्चिम महाराष्ट्रातील कारखाना परिसरातील कामगारांचा शोध घेत मुलांना परत शाळेत पाठविण्या बाबत प्रबोधन करीत यशस्वीपणे मुलांना शाळेत आमच्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत.

दि. १५ डिसेंबर रोजी सायंकाळी कोपरगाव येथील संजीवनी सहकारी साखर कारखाना ऊसतोडणी क्षेत्रात, जि प प्रा शा अंबाला शाळेचे पदवीधर शिक्षक कल्याण पवार व हिवरखेडा (गौ.) शाळेचे शिक्षक दिलीप मगर यांनी ऊसतोडणी कामगारांच्या स्थलांतरित मुलांना शाळेत परत आणण्यासाठी ऊसतोड मजुरांची भेट घेतली.

यामध्ये प्रामुख्याने जि.प शाळा अंबाला, उपळा, गराडा, तांदुळवाडी, वडनेर, मुंडवाडी तांडा, आंबा तांडा, जेहुर तांडा येथील पालकांची समजूत काढून व संबधित शाळेतील वर्गशिक्षकांशी मुलांचे व पालकांचे बोलणे करून संपर्क साधला. या मुलांना शाळेत परत पाठवण्यासाठी शिक्षकांनी आग्रह धरला. हंगामी वसतिगृहात अथवा नातेवाईकाकडे मुलांना ठेवण्याची विनंती यावेळी करण्यात आली.

तसेच सोमवार पासून मुलांना शाळेत पाठवण्याचे व शिक्षणात खंड न पडू देण्याचे आश्वासन यावेळी पालकांनी दिले. मागील आठवड्यात अंबाला शाळेतील मुख्याध्यापक डी एस राजपूत, पदवीधर शिक्षक कल्याण पवार, सहशिक्षक किशोर आगळे, ज्ञानेश्वर वाघ, यांनी नगर पुणे व सातारा जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांना शाळेच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी (प्राथ.) जयश्री चव्हाण तसेच गटशिक्षणाधिकारी नीता श्रीश्रीमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली बालरक्षक टीम, ऊसतोडणी कामगारांच्या राज्यभरात स्थलांतरित झालेल्या मुलांना शाळेत परत आणण्यासाठी प्रयत्न करत आहे.

त्याला चांगल्या प्रकारे यश मिळत असल्याने शिक्षणप्रेमींनी कौतुक केले आहे.चौकट....कोपरगाव येथील संजीवनी साखर कारखाना येथे बालरक्षक म्हणून पालकांसोबत स्थलांतरित झालेल्या विद्यार्थ्यांना भेट दिली असता आमच्या असं लक्षात आलं की पालकांना योग्य मार्गदर्शन केल्यास आणि विद्यार्थ्यांची व्यवस्था त्याच्या नातलगाकडे केल्यास मुले निश्चितपणे शाळेच्या प्रवाहामध्ये आणली जाऊ शकतात.

यासाठी गावातील प्रतिष्ठीत नागरीक, शिक्षक, शिक्षणप्रेमींनी प्रयत्न करुण पालकांचे प्रबोधन केल्यास व अशा मुलांना भौतिक सुविधा उपलब्ध करुण दिल्यास या मुलांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणून शैक्षणिक प्रगती साधता येईल- शिक्षक दिलीप मगर







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १७ डिसेंबर २०२४


## अ.भा. बालकुमार साहित्य संस्थेची कन्नड येथे स्थापना अध्यक्षपदी डॉ. शिवाजी हुसे



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड तालुक्यामध्ये बालसाहित्याची चळवळ रुजावी, उत्तमोत्तम बाल साहित्यिक घडावेत, शालेय जीवनातच विद्यार्थ्यांवर बालसाहित्याचे संस्कार व्हावेत त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे या उद्देशाने कन्नड येथे अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था पुणे शाखा कन्नड तालुका सुरू करण्यात आली आहे. नुकतेच शाखा सुरू करण्याबाबतचे मान्यतापत्र संस्थेचे अध्यक्ष माधव राजगुरू यांच्याकडून प्राप्त झाले आहे.

कन्नड तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून कन्नड तालुका अध्यक्षपदी प्रा. डॉ. शिवाजी हुसे यांची तर कार्यवाहपदी डॉ. रामचंद्र झाडे यांची निवड करण्यात आली आहे. उर्वरीत कार्यकारिणी अशी - उपाध्यक्ष - लक्ष्मण वाल्डे, कोषाध्यक्ष - ज्ञानेश्वर गायके, सदस्य - अरुण थोरात, प्रविण दाभाडे, भीमराव सोनवणे, अनिता चव्हाण -राठोड, संदीप ढाकणे, संदीप वाकडे, सुरेश औटे, यांची निवड करण्यात आली आहे. सल्लागार समिती म्हणून प्राचार्य डॉ. विजय भोसले, डॉ. सिताराम जाधव,ॲड. कृष्णा जाधव, सागर जाधव, डॉ. अंबादास सगट, डॉ. रमेश सूर्यवंशी, प्रा. रंगनाथ लहाने, डॉ. प्रतिभा अहिरे, यांची निवड करण्यात आली आहे. विविध कार्यक्रमाचे व उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

ज्यांना या उपक्रमात सहभागी व्हायचे आहे त्यांनी डॉ. शिवाजी हुसे यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन कार्यकारिणीच्या वतीने करण्यात आले आहे.

## बीड सरपंच हत्येतील आरोपींना लवकरात लवकर अटक करा विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंची मागणी



**नागपूर :** बीड मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येतील फरार ३ आरोपींना लवकरात लवकर अटक करावी. तसेच या घटनेत दोषी असलेल्या सर्वांची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आज सभागृहात केली.

बीड मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची माहिती आज २८९ अनव्ये दानवे यांनी सभागृहात मांडली.

या गंभीर हत्येत राज्य मंत्रिमंडळातील मंत्र्यांच्या जवळचे वाल्मीक कराड यांचा सहभाग असल्याची येथील गावकऱ्यांना शंका असल्याची माहिती दानवे यांनी सभागृहात दिली.

संतोष देशमुख यांच्या हत्येत सहभागी सर्व आरोपींना तात्काळ अटक करून वाल्मीक कराड यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणीही दानवे यांनी आज परिषद सभागृहात केली.

आर्टीफिशल इंटेलिजन्सच्या माध्यमातून आरोपींना शोधून त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे आश्वासन यावेळी मुख्यमंत्री यांनी दिले.

## देशसेवेसाठी तरुणांनी तत्पर रहावे - डॉ संजय अस्वले



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील उमरगा येथील कॅडेट रावण ममाळे (सीआयएसएफ) माजी विद्यार्थी संदिप कुंभार (आयटीबीपी), नवनाथ पाश्मे ( सीआरपीएफ) यांचे स्पर्धा परीक्षा पोलीस, सैन्यदल ॲकडमी, करिअर कट्टा, NCC विभागा तर्फे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले यांनी त्यांचा सत्कार व अभिनंदन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षिय भाषणात कॅडेटसना, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सरांनी आपल्या भाषणात सांगितले की केवळ सैन्यदल, पोलीस, निमलष्करी पदावर भरती झाल्या नंतर न थांबता एमपीएससी, युपीएससी या स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातुन वर्ग एक (क्लासवन), वर्ग दोन (क्लासटु 'ची तयारी करावी असे सांगितले या साठी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, करिअर कट्टा, सैन्य -पोलिस भरती पूर्व प्रशिक्षण जे की लेखी परीक्षेची तयारी करूण घेते व एनसीसी च्या माध्यमातून मैदानाची तयारी करूण घेते.

या साठी विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेऊन देशाची सेवा करावी असे आवाहन केले. या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ विलास इंगळे, डॉ पदमाकर पिटले, कॅप्टन ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले, उपस्थित होते. सूत्रसंचलन डॉ चंद्रसेन करे आणि आभार डॉ समाधान पसरकले यांनी केले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कॅडेटस, विद्यार्थी, कर्मचारी बहुसंखेने उपस्थित होते.

## तबल्याचा ताल हरपला! झाकीर हुसेन यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची श्रद्धांजली



मुंबई, १६ डिसेंबरप्रसिद्ध तबलावादक उस्ताद झाकीर हुसेन यांच्या निधनाने तबल्याच्या ताल हरपला आहे. तबल्याच्या नादमाधुर्याने संबंध जगातील रसिक श्रोत्यांना एका समेवर आणणारा महान सुपुत्र आपण गमावला आहे, अशा शोकसंवेदना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केल्या आहेत.महाराष्ट्राचा सुपुत्र असलेल्या झाकीर हुसेन यांनी अवघ्या जगाला तबल्याचे वेड लावले.

तीन पिढ्यांसोबत तबल्याची जुगलबंदी सादर करणारे झाकीर हुसेन यांनी अनेक युवकांना तबला वादनाकडे आकर्षित केले. तबल्याच्या क्षेत्रात भारताची वेगळी ओळख त्यांनी जगात निर्माण केली.

तबलानवाज पद्मविभूषण उस्ताद झाकिर हुसेन आणि तबला हे अद्वैत होते. हे अद्वैत आता भंगले आहे. जादुई बोटांनी त्यांनी स्वरमंडलात उभे केलेल्या अनेक अद्भुत मैफिली यापुढे तालयोगी तबलानवाझ उस्ताद झाकिर हुसेन यांच्याविना सुन्यासुन्या वाटत राहतील. वयाच्या सातव्या वर्षापासून तबलावादनाची सुरवात करणाऱ्या उस्ताद झाकिर हुसेन यांनी तबलावादनातील एकल मैफिलींनाही प्रतिष्ठा मिळवून दिली. भारतीय संगीताला जागतिक पातळीवर सन्मान मिळवून देण्यात हुसेन यांचा सिंहाचा वाटा आहे.

त्यांचे शिष्य जगभर संगीताची सेवा करत आहेत. वडिलांकडून मिळालेला संगीताचा वारसा त्यांनी केवळ जोपासलाच नाही तर तबलावादनाला अत्युच्च अशा शिखरावर नेले. गाणारा तबला ही त्यांच्या जादुई बोटांची करामत अनेकांनी अनुभवली आहे. ज्येष्ठ कलाकारांबरोबर केलेली जुगलबंदी रसिकांसाठी पर्वणी होती. तरूण आणि होतकरू कलाकारांना व्यासपीठ मिळावे, त्यांची कला सादर व्हावी, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

तबल्याला समानार्थी नाव झाकीर हुसेन होते.

साथीच्या या वाद्याला त्यांनी व्यासपीठाच्या केंद्रस्थानी आणून त्याला जनमनात स्थान मिळवून देण्याचे महान कार्य केले. त्यांच्या निधनाने भारतीय संगीताचा तेजस्वी तारा निखळला आहे.

मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या आणि चाहत्यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १७ डिसेंबर २०२४


## स्वर्गीय बाबुरावजी औराळकर न्यु हायस्कूल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे उद्‌घाटन



**कन्नड (अक्षय चव्हाणस) :** कबड्डी, खो-खो, कुस्ती, धावणे रस्सीखेच, व्हॉलीबॉल यासारखे मैदानी खेळ खेळून विद्यार्थ्यांनी आपली तब्येत तंदुरुस्त ठेवावी. हि कमावलेली तब्येत तुम्हाला निश्चितच पोलीस, सैन्यदलाच्या भरतीसाठी उपयोगी पडेल असा विश्वास जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव यांनी शनिवारी व्यक्त केला.

कन्नड तालुक्यातील औराळा येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या स्वर्गीय बाबुरावजी औराळकर न्यु हायस्कूल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष व माजी सहकार मंत्री स्वर्गीय विनायक (अण्णा) पाटील यांच्या स्मृतीप्रित्यार्थ कबड्डी, खो-खो, व्हॉलिबॉल, फुटबॉल, रस्सीखेच, शंभर मिटर धावणे यासह अनेक तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धे चे उद्‌घाटन प्रकाश भांडवलदार, त्र्यंबकराव पार्थीकर, बाजार समितीचे उपसभापती जयेश बोरसे, पंढरीनाथ निकम, अप्पासाहेब भोजणे, अतुल निकम, प्रार्चायसोमाकांत दाभाडे यांच्या हस्ते शनिवारी मोठ्या करण्यात आले.

यावेळी सागर जाधव बोलत होते.पुढे बोलतांना सागर जाधव म्हणाले की, शालेय विद्यार्थ्यांना मैदानी खेळापेक्षा मोबाईलरील गेम खेळण्यात रस वाटतो आहे. परंतु, मोबाइलवरील गेम खेळणे म्हणजे स्वतःहुन डोळ्याचे व मेंदुचे आजाराला निमंत्रण देणे आहे. म्हणुन जास्ती जास्त मैदानी खेळ खेळा. हेच खेळ तुमचे भविष्य बदल्याशिवाय राहणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या स्पर्धेत कन्नड, औराळा, जेहर, देभेगाव, साकेगाव, चिकटगाव, तलवाडा या शाळेतील संघानी सहभाग घेतला होता. प्राचार्य सोमाकांत दाभाडे यांनी प्रास्ताविक तर जे.एस. बिरारी यांनी सुत्रसंचालन व अरुण नलावडे यांनी आभार मानले.

या क्रीडा स्पर्धा यशस्वी होण्यासाठी अशोक जैस्वाल, ऋषिकेश जाधव, बी. जी. शेख, बी. बी. आहेर, आर. एम. काटकर, संदीप आढाव, ए. एच. राजपूत आदींसह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## संतोष देशमुख हत्या प्रकरण संसदेत

**बीड :** जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणावर खासदार बजरंग सोनवणे लोकसभेत आवाज उठवला. बीड जिल्ह्यात कायदा-सुव्यवस्था राहिली नसून एका सरपंचाची अपहरण करून हत्या करण्यात आली. या हत्या प्रकरणी सखोल चौकशी करून सर्व आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी बजरंग सोनवणे यांनी संसदेत केली.

बीडच्या केज तालुक्यातील सरपंच संतोष देशमुख हत्याकांडाचे जिल्ह्यासह राज्यभरात तीव्र पडसाद उमटलेत. खासदार बजरंग सोनवणे यांनी या प्रकरणी आरोपींना तत्काळ अटक करण्याची मागणी केली होती. तसेच हे प्रकरण सीआयडीकडे सोपवण्याचाही आग्रह धरला होता. याबाबत बजरंग सोनवणे यांनी आज लोकसभेतही आवाज उठवला.

संतोष देशमुख यांच्या क्रूर खूनप्रकरणातील सर्व मारेकऱ्यांना अटक करून त्यांना फाशीची शिक्षा द्यावी, अशी ठाम मागणी खासदार बजरंग सोनवणे यांनी आज संसदेत मांडली. माझ्या मतदारसंघातील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. या हत्या प्रकरणी सखोल चौकशी करून सर्व आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी करत आहोत. संतोष देशमुख यांना न्याय मिळायला पाहिजे. ही माझी सभागृहाला विनंती आहे, असे खासदार बजरंग सोनवणे म्हणाले.

संतोष देशमुख व त्यांचा वाहन चालक काही दिवसांपूर्वी चारचाकी गाडीतून मस्साजोगकडे जात होते. यावेळी डोणगावजवळ २ वाहनांतून आलेल्या अज्ञात व्यक्तींनी त्यांची कार रोखली. त्यांना काठीने बेदम मारहाण केली. त्यांनंतर त्यांना बळजबरीने आपल्या गाडीत बसून केजच्या दिशेने नेले.

याविषयी केज पोलिस ठाण्यात अपहरणाची तक्रार दाखल करण्यात आली. पण काही तासांतच बोरगाव - दहीटना मार्गावर संतोष देशमुख यांचा मृतदेह आढळून आला. पोलिसांनी या प्रकरणी आतापर्यंत ३ आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.


